# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 8 (                ) महिलांकडे योग्य निर्णय क्षमता असल्यामुळे या निर्णय क्षमतांचा योग्य वापर आणि सहभाग वाढविल्यास देशाची उन्नतीकडे अधिक वेगाने वाटचाल होईल, असे प्रतिपादन रायपूर (छत्तीसगड) येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शताब्दी पांडे यानी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील `मनस्विनी` या महिला समुहाच्या वतीने महिला दिनानिमित्त शुक्रवार, दि. 8 मार्च रोजी श्रीमती शताब्दी पांडे यांचे व्याख्यान झाले. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ.रत्नमाला बेंद्रे उपस्थित होते.

श्रीमती पांडे म्हणाल्या की, प्रत्येक क्षेत्रात भारतीय स्त्रीची यशस्वी घोडदौड सुरु आहे. समाजात स्त्रियांना अधिक मान मिळण्याची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रातील तिचा सहभाग वाढल्यास राष्ट्र उन्नत होईल. कारण महिलांकडे अचुक निर्णय क्षमता, योग्य वेळेचे व्यवस्थापन असते. स्त्री आर्थिक दृष्टया सबल झाली तर अनेक प्रश्न सुटतील. त्यामुळे तिने पायावर उभे राहणे गरजेचे आहे. परिवार आणि समाजात राहून योग्य दिशा देण्याचा प्रयत्न महिलांनी करावा असे आवाहन करताना श्रीमती पांडे यांनी छत्तीसगड मधील सामाजिक काम करतानाचे विविध अनुभव यावेळी कथन केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.माहुलीकर यांनी उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग लक्षणीय वाढत असल्यामुळे स्त्री सबलीकरणाला प्रारंभ झाला असल्याचे सांगितले. प्रारंभी मनस्वीनीच्या चित्रा कोळी, सविता पगारे, कांचन देशमुख यांनी बहिणाबाईंच्या कविता सादर केल्या. सविता पगारे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय वीणा उध्दगे यांनी करुन दिला. अरुणा सैंदाणे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. व्याख्यानानंतर सांस्कृतिक कार्यक्रमात उषा खाडे, निता पाटील यांनी भाग घेतला. माया जाधव यांनी त्वचेची काळजी घेण्याविषयी माहिती दिली. कांचन देखमुख यांनी आभार मानले. याच कार्यक्रमात धरणगाव येथील तहसीलदार मिलिंद कुलथे व कैलास देवरे यांनी मतदान जागृतीचा भाग म्हणून ईव्हीएम व्हीव्ही पॅट विषयी सविस्तर माहिती दिली.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९                                दिनांक : ८ मार्च, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 8 (          ) महिला दिनाच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात ` साहित्य सृजन ` या भित्तीपत्रिकेचे विमोचन विद्यापीठातील महिला सफाई कामगार श्रीमती लताबाई नन्नवरे व रेखा कोष्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी केंद्राचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी बोलतान या महिला म्हणाल्या की, असा सन्मान आमच्या वाटयाला कधी आलाच नाही, आज आम्हांला खूप आनंद होत आहे. आमचा सन्मान भाषा अभ्यास प्रशाळेने केला.

अध्यक्षीय मनोगतात प्रा.डॉ.पगारे यांनी महिलांना सन्मानाची व समतेची वागणूक दिली पाहिजे. त्यांच्यात गरीब, श्रीमंत असा भेदभाव न करता महिलांच्या उन्नतीसाठी सर्वांनीच प्रयत्नशील असले पाहिजे व असमानतेच्या चौकटी नष्ट केल्या पाहिजेत. पुरुषांनी देखील महिलांना सन्मानाने वागवले पाहिजे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डॉ.मुक्ता महाजन, हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुनील कुलकर्णी, प्रा.डॉ.आशुतोष पाटील व प्रशाळेतील इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.दीपक खरात यांनी केले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ८ मार्च, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी